दैनिक लोकमत

वाचकांच्या पहिल्या पसंतीचे मराठी राष्ट्रीय दैनिक

मंगळवार, दि. २२ ऑगस्ट २००६ पृष्ठे : १२+४=१६ किंमत - रु. २.०० मुंबई

# ठाण्यातील गृहसंकुलात पवनऊर्जा



प्रतिनिधी/दि. २१

ठाणे- संपूर्ण महाराष्ट्रात विजेची टंचाई आहे. त्यावर कोणी इन्व्हर्टरचा तर कोणी जनरेटरचा इलाज शोधून काढतो. कुणी इमर्जन्सी लॅम्प वापरतो. परंतु, ठाण्यात मात्र एका नव्याने साकारत असलेल्या गृहसंकुलात स्वत:च्या मालकीचे पवनऊर्जा केंद्र उभारले जात आहे. पोखरण, रोड क्र. २ वर साकारणाऱ्या या गृहसंकुलातील रहिवाशांवर कधीही वीजकपातीला तोंड देण्याची वेळ यामुळे येणार नाही. विशेष म्हणजे ही वीज त्यांना मोफत उपलब्ध होणार आहे. हे पवनऊर्जा केंद्र उभारण्यासाठी अवघा दीड लाख रुपये खर्च येणार आहे. हा प्रयोग यशस्वी झाला तर सर्वच विकासक त्याचे अनुकरण करतील. या स्वरूपाचा भारतातील हा पहिलाच प्रयोग असून, तो साकारण्याचा मान ठाण्याला लाभला आहे. ही ऊर्जानिर्मिती पूर्णपणे प्रदूषणमुक्त अशी असेल.